# महाराष्ट्र विधानपरिषद

सत्यमेव जयते

## आवाहनपत्र

क्रमांक २६०६९/ई-२,  
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**  
विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन,  
मुंबई ४०० ०३२.  
दिनांक : २२ ऑक्टोबर २०१८ / आश्विन ३०, १९४० (शके)

**प्रति,**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य  
(मंत्री व राज्यमंत्री यांसह).

**महोदय/महोदया,**

कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांनी भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४ अन्वये त्यांना प्रदान केलेले अधिकार वापरून महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन, सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०१८ रोजी दुपारी १२-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात भरविण्याचे ठरविले आहे (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, अधिसूचना क्रमांक २६०६५/ई-२, दिनांकित २२ ऑक्टोबर २०१८ पहा). म्हणून, महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम ३ अन्वये मी आपणांस विनंती करतो की, आपण वर नमूद केलेल्या वेळी मुंबई येथील विधान भवनात विधानपरिषदेच्या अधिवेशनासाठी उपस्थित रहावे.

आपला स्नेहांकित,

**(डॉ. अनंत कळसे)**  
प्रधान सचिव,  
महाराष्ट्र विधानपरिषद.

(शा.म.मु.) एचब्री ४९९ (६००—१०-२०१८)